सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,
E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

प्रेस नोट क्र. ३१ दिनांक :- ०८/०५/२०२४

# आगामी लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांची अवैध गावठी दारु हातभट्टीवर कारवाई करत एकुण १,०३,४५०/- रु किंमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला

मा. श्री. डॉ. डी. एस. स्वामी, पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली धाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण आगामी लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रा मधील अवैध दारु, जुगार, अंमली पदार्थ तसेच मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे कामी व त्यास प्रतिबंध करणेकामी सुचना दिलेल्या होत्या त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हयात अशा प्रकारचे अवैध धंदे, जुगार यांचेबाबत माहिती मिळवुन कारवाई करणेकामी वेग-वेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्श केले.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे कार्यवाही करीत असतांना दिनांक ०७/०५/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या वाशिंद युनिट पथकाला वाशिंद पोलीस ठाणे हद्दीमध्ये शेरे गावात राहणारा बाळु महादु चौधरी वय ६२ रा. मु. पो. शेरे ता. शहापुर जि. ठाणे हा इसम शेरे गावातील झाडा-झुडपाचे जागेत गावठी हातभट्टीची दारु बनवितो अशी खात्रीशीर माहिती मिळाली सदर ठिकाणी छापा टाकला असता सदर ठिकाणी अवैधरित्या गावठी दारुची भट्टी, गुळ नवसागर मिश्रीत रसायने असे एकुण १,०३,४५०/- रु किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला आहे. पुढील तपास वाशिंद पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, श्री. डी. एस. स्वामी तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक, श्रीमती दिपाली धाटे यांनी दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वाशिंद युनिट मधील पोहवा/२४०७ प्रकाश साईल, पोहवा/२५०७ संतोष सुर्वे, पोहवा/७५६ गोविंद कोळी, पोशि/३२८० स्वप्नील बोडके यांचे पथकाने कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगीरी केलेली आहे.

****************************************************************************